# प्रेसनोट

दिनांक– २६/११/२०१८.

## महावितरण कार्यालय, कल्याण येथील विद्युत सहायक यांना लाच स्विकारताना अटक

दिनांक २६/११/२०१८ रोजी, महावितरण कार्यालय, नेतीवली, कल्याण येथील विद्युत सहायक **अशोक वसंत कोकाटे**, वय २७ वर्षे यांना यातील तक्रारदार यांच्याकडून ४,०००/– रुपयांची लाच स्विकारताना रंगेहात पकडण्यात आले असुन, त्याबाबत थोडक्यात हकिकत खालीलप्रमाणे.

यातील तक्रारदार यांच्या चाळीतील खोलीला नविन विद्युत मीटर कनेक्शन बसवून देण्यासाठी वरील नमुद लोकसेवक यांनी तक्रारदार यांच्याकडे ४,०००/– रुपये लाचेची मागणी केली होती. सदरबाबत तक्रारदार यांनी ॲन्टी करप्शन ब्युरो, ठाणे यांचेकडे तक्रार नोंदविली होती.

तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने पडताळणी केली असता, वरील नमुद लोकसेवक यांनी तक्रारदार यांच्याकडे लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाल्यावरुन ॲसीबी, ठाणे युनिट यांनी सापळयाचे आयोजन करुन लोकसेवक **अशोक वसंत कोकाटे** यांना तक्रारदार यांच्याकडून ४,०००/– रुपयांची लाच स्विकारताना रंगेहात पकडण्यात आले. गुन्हयाचा पुढील तपास पोलीस निरीक्षक, श्रीमती सीमा आडनाईक, ॲसीबी, ठाणे हया करीत असुन त्यांचा संपर्क क्रमांक ८१०८९४९४६०.

शासकीय लोकसेवकाने लाचेची मागणी केल्यास त्याबाबत ॲन्टी करप्शन ब्युरो, ठाणे कार्यालयास खालील दुरध्वनी क्रमांकावर संपर्क करावा.

---

१) टोल फ्री क्र. :- **1064**
२) दुरध्वनी क्रमांक :- **022–25427979**
३) ई-मेल आयडी :- **spacbthane@mahapolice.gov.in**
४) वेबसाईट :- **www.acbmaharashra.gov.in**

Scanned by CamScanner